CSMSS
Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Sanstha's
CHH. SHAHU COLLEGE OF ENGINEERING
Kanchanwadi, Paithan Road, Chhatrapati Sambhajinagar 431 011

**Center for Engineering Exploration**

# PROJECT EXPO-IGNITE 2025

छत्रपती संभाजीनगर | १४ जून २०२५

## सीएसएमएसएसच्या छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात इग्नाईट २०२५ प्रोजेक्ट एक्स्पोचे भव्य आयोजन: नावीन्यपूर्ण कल्पनांचा आणि युवा प्रतिभेचा लोभस आविष्कार




छत्रपती संभाजीनगर | १४ जून २०२५

इंनोवेशन, तांत्रिक प्रतिभा आणि विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा जल्लोष साजरा करणाऱ्या 'इग्नाईट २०२५' या भव्य प्रोजेक्ट एक्स्पोचे यशस्वी आयोजन सीएसएमएसएस छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयात करण्यात आले. हा उपक्रम सेंटर फॉर इंजिनिअरिंग एक्सप्लोरेशन आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विभाग (व्हीएलएसआय डिझाईन अँड टेक्नॉलॉजी) यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (ISTE) च्या सहकार्याने पार पडला. या प्रोजेक्ट एक्स्पोचे उद्घाटन किर्दक ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मा. श्री. सुनील किर्दक यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय डंभारे (प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर) आणि श्री. नरेंद्र इस्तोलकर (सहसंचालक, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, भारत सरकार) यांची उपस्थिती लाभली. याशिवाय संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, श्री. संजय पाटील (जनसंपर्क अधिकारी), श्री. अनिल तायडे (मानव संसाधन विभाग), प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, उपप्राचार्य डॉ. देवेंद्र भुयार हे मान्यवर देखील उपस्थित होते. इग्नाईट २०२५ मध्ये विद्यार्थ्यांनी आरोग्य, शेती, ऑटोमेशन, सुरक्षा आणि स्टार्टअप्स यांसारख्या विविध क्षेत्रांतील १७० हून अधिक नाविन्यपूर्ण व वापरयोग्य प्रोजेक्ट्सचे सादरीकरण केले.

# प्रोजेक्ट एक्स्पो - इग्नाईट २०२५

काही प्रोटोटाइप्सना उद्योगजगतातून प्रतिसाद मिळू लागला असून, ते व्यावसायिक रूपात पुढे नेण्याच्या प्रक्रियेत आहेत. 'ऑटोमॅटिक क्वाथ डिस्पेन्सर', 'आयुर्वेदिक मेडिसिन स्टिरर', 'व्हीलचेअर-कम-बेड मेकॅनिझम', 'लोड लिफ्टिंग मशीन' हे काही उल्लेखनीय प्रकल्प ठरले.

या प्रदर्शनाचे एक वैशिष्ट्य म्हणजे प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, जो नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी (NEP-2020) सुसंगत 'इंजिनिअरिंग एक्सप्लोरेशन प्रोग्राम' मुळे शक्य झाला. या उपक्रमामार्फत विद्यार्थी हँड्स-ऑन प्रोजेक्ट्सवर काम करताना डिझाईन थिंकिंग, टीमवर्क आणि प्रॉब्लेम सॉल्विंग यांसारखी मूलभूत तांत्रिक कौशल्ये आत्मसात करतात. यंदा सादर करण्यात आलेल्या ५०% हून अधिक प्रकल्पांमध्ये आयओटी, एआय व ऑटोमेशन यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश होता, जो भविष्यातील उद्योगक्षेत्रात लागणाऱ्या कौशल्यांशी सुसंगत आहे.

या एक्स्पोला २५०० हून अधिक दर्शक आणि ५० पेक्षा अधिक नामांकित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी भेट दिली यामुळे विद्यार्थ्यांना थेट इंडस्ट्री एक्सपोजर मिळाले.

या यशस्वी उपक्रमाबद्दल सीएसएमएसएस संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रणजित मुळे व सचिव मा. श्री. पद्माकरराव मुळे यांनी आयोजक, सहभागी विद्यार्थी व प्राध्यापकांचे अभिनंदन केले. त्यांनी सेंटर फॉर इंजिनिअरिंग एक्सप्लोरेशन च्या नवोन्मेषाभिमुख प्रयत्नांचे कौतुक करत, हा उपक्रम भविष्यातील उद्योगसिद्ध अभियंते घडविण्याच्या दृष्टीने आदर्श ठरत असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. विनोद दामधर आणि डॉ. एस. जे. होनाडे यांनी संपूर्ण आयोजन यशस्वीरीत्या पार पाडले. त्यांना प्रा. डी. एल. गाडे, प्रा. जी. एम. कोटिये, प्रा. एस. आर. मिल्के, आणि प्रा. एस. यू. थोरवेयांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. मनोज मते यांनी प्रभावीपणे केले.



## विद्यार्थ्यांचा अनुभव:



इग्नाईट २०२५ ने मला माझ्या कल्पनांना वास्तवात उतरवण्याची संधी दिली. हा एक प्रेरणादायी आणि नवीन काहीतरी शिकण्याचा मौल्यवान अनुभव होता.

**-रजत मिसाळ, प्रथम वर्ष यंत्रअभियांत्रिकी विभाग**



"इग्नाईट २०२५" मुळे माझा आत्मविश्वास वाढला आणि मला इंजिनिअरिंग एक्सप्लोरेशन लॅबच्या मदतीने माझी कल्पना प्रत्यक्षात मांडता आली."

**- अनुष्का राठोड, प्रथम वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विभाग**